प्रेसनोट जळगाव. दिनांक-०४/०५/१६

प्रति,

*मा. संपादक*

*दै.-------------------------*

## जळगाव जिल्ह्यातील नागरीकांना आवाहन..

सद्या शालेय परिक्षा संपल्या आहेत तसेच खुप मोठ्या प्रमाणावर लग्नतिथी असुन बहुतांशी नागरीक हे सुटी लागल्याने व लग्न कार्यानिमीत्त बाहेर गावी जाण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. नागरीक बाहेर गावी जातांना घरे बंद असतात त्याचा गैरफायदा घेवुन चोरटे हे बंद घरांचे कुलुपे,कडीकोंडे तोडुन ,खिडकीचे ग्रिल तोडुन घरात प्रवेश करुन घरफोडी चोरी करतात.जळगाव जिल्ह्यातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की,आपण सुटी दरम्यान व लग्न तसेच इतर कार्यक्रमांना बाहेर गावी जातांना आपल्या घराची,मालमत्तेची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. पोलीस प्रशासनाने जनतेचे मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी आपलेस्तरावर योग्य ती खबरदारी घेतलेली असुन नागरीकांनी देखील खालील प्रमाणे उपाययोजना कराव्यात

१.बाहेर गावी जातांना नागरीकांनी शेजारच्यांना सुचित करावे, घराकडे लक्ष देण्याबाबत सांगुन शवय असल्यास एका व्यक्तींने घरी थांबावे.

२.घराचे सर्व दरवाजे खिडक्या व्यवस्थीत बंद केलेले आहेत किंवा नाही याची खात्री करावी.त्यांना लावण्यात आलेले ग्रिल मजबुत असतील याची काळजी घ्यावी. त्यांना लावण्यात आलेली कुलुपे हि मजबुत,शक्यतोवर डुप्लीकेट चाबीने उघडणार नाहीत,तसेच तुटणार नाहीत व कापले जाणार नाहीत अशा धातुची लावावीत. व शक्यतो दरवाज्याचे आतील लॅच लॉक बसवावेत त्याचप्रमाणे दरवाजे व खिडक्यांना लावण्यात आलेले कडीकोंडे देखील मजबुत बसवावीत. कडीकोंडे शोभेची वस्तु नसुन ती संरक्षणासाठी आहेत याचे गांभीर्य लक्षात घ्यावे.

३.दरवाज्यांना कुलुप लावले आहे किंवा नाही याची खात्री करावी.

४.बाहेर गावी जाताना आपला मोबाईल क्रमांक आपले शेजारील व्यक्तींना किंवा ओळखीच्या व्यक्तीं जवळ देवुन जावा जेणे करुन तात्काळ संपर्क करता येईल.

५.बाहेर गावी जातांना घरात कोणतीही मौल्यवान वस्तु ठेवु नये.

६.सदर मौल्यवान वस्तु या बॅकेचे लॉकर किंवा सुरक्षीत ठिकाणी ठेवावे.

७.आपण बाहेर गावी जातांना बाहेर पॅसेज मधील लाईट सुरु ठेवावा.

८.शक्य असल्यास घराचे बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत.सदरचे कॅमेरे लावतांना त्याद्वारे संपुर्ण चित्रण होईल व ते कॅमेरे शक्यतोवर नजरेस पडणार नाहीत अशा छुप्या रीतीने लावावीत. तसेच सि सि टी व्ही यंत्रणेचा डिव्हीआर बॉक्स हा चोरटयांना सापडणार नाही अशा सुरक्षीत ठिकाणी बसवावा.

९.घराचे दरवाजांना लोखंडी ग्रीलचे मजबुत दरवाजे बसवावेत जेणे करुन आपले घर व घरातील मालमत्ता,मौल्यवाण वस्तु सुरक्षीत राहील.

१०.अपार्टमेंट मधील व्यक्तींनी एकमेकांचे सुरक्षीततेकरीता सुरक्षा रक्षक नेमावा.अपार्टमेंट मध्ये राहाणारेनागरीकांनी एकमेकांचे घरांकडे सुरक्षेच्या दृष्टीने लक्ष ठेवावे. एकमेकांच्या सुरक्षेची काळजी घ्यावी.

Scanned by CamScanner

११.अपार्टमेंट मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत.शक्यतोवर सेंट्रलाईज सि सी टी व्ही यंत्रणा बसवुन संपुर्ण अपार्टमेंटची सुरक्षा होईल अशा रीतीने बसवुन त्याचा देखील डिव्हीआर शक्यतोवर चोरटयांना मिळुन येणार नाही अशा पध्दतीने बसवावा.

१२. कॉलनी भागात ,परीसरात , वसाहतीत फिरते विक्रेते,सोने पॉलीश करुन देणारे यांना घरात प्रवेश देवु नये, ते घरात किंवा अपार्टमेंट मध्ये प्रवेश करणार नाही याची खबरदारी घ्यावी.

१३.कॉलनी परिसरातील पोलीस मित्र व तरुण मुलांनी एकत्र येवुन आळीपाळीने रात्रीचे वेळी हातात काठी घेवुन गस्त करावी जेणे करुन अनोळखी व्यक्ती दिसल्यास त्या व्यक्तीची खात्री करावी व सदर अनोळखी व्यक्ती कोणाकडे जात आहे किंवा काय कामा करीता जात आहे अशी खात्री न झाल्यास सदर व्यक्ती बाबत जवळील पोलीस स्टेशनला किंवा नियंत्रण कक्षास फोन व्दारे कळवावे.

**नियंत्रण कक्ष जळगाव दुरध्वनी क्र.०२५७-२२२३३३३ / १०० तसेच जनतेच्या पोलीसांबाबतचा सुसंवाद वाढविण्यासाठी तसेच सुचना,समस्या, पोलीसापर्यत पोहोचविण्यासाठी जळगांव जिल्हा पोलीस दलातर्फे Whats app मोबाईल सेवा क्रमांक - ९४२२२१०७०२ याचेवर मेसेज पाठवावा.**

**( डॉ.जालिंदर सुपेकर )**
**पोलीस अधिक्षक जळगाव**

Scanned by CamScanner